महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १७१/प्रनिप्रा/२८ऑक्टो./इतिवृत्त/१०६२४ दिनांक : - 9 NOV 2022

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी ०३:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **६७व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकए २) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, ३) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्य प्रणालीद्वारे) व ४) श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व ३) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. हे काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २१/०३/२०२२ ते २९/०७/२०२२ या कालावधीतील झालेल्या बैठकीचे इतिवृत्त मान्यतेकरिता सादर.**

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या कामकाजाबाबत विनियम शासन स्तरावर प्रलंबित असून आजच्या बैठकीसाठी नियमित ०६ सदस्यांपैकी केवळ दोन सदस्य प्रत्यक्ष तर एक सदस्य ऑनलाईन उपस्थित असल्याची बाब निदर्शनास आणुन विषयपत्रिकेवरील विषय क्रमांक ०१ अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २१/०३/२०२२ ते २९/०७/२०२२ या कालावधीतील एकुण २७ बैठकांची इतिवृत्ते मान्यतेकरिता सादर करणे या सारखी महत्वाची बाब प्रस्तुत बैठकीपुढे अंतर्भूत असल्याने, उपस्थित सदस्यांची अपुरी संख्या लक्षात घेता सदर विषय पुढील बैठकीत ठेवला जावा, असे सूचित केले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

या संदर्भात उपस्थित सदस्य डॉ. अभय वाघ व डॉ. रविंद्र बंगाळ तसेच सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी दिनांक २१/०३/२०२२ ते २९/०७/२०२२ या कालावधीमध्ये झालेल्या बैठकींचे इतिवृत्त सविस्तर तपासून तद्नंतर इतिवृत्तांस मान्यता देण्यास हरकत नसावी असे प्राधिकरणास सूचित केले, सबब मा. सदस्यांनी सूचविल्यानुसार प्राधिकरणाच्या दिनांक २१/०३/२०२२ ते २९/०७/२०२२ या कालावधीमध्ये झालेल्या बैठकींच्या इतिवृत्तांबाबत प्राधिकरणाच्या सदस्यांनी तपासून त्यांचे म्हणणे/अभिप्राय सादर करण्याबाबत चर्चा करण्यात आली त्याअनुषंगाने उपरोक्त सर्व बैठकांचे इतिवृत्त पुन:श्च सर्व सदस्यांना पाठविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आणि तद्नुषंगाने सदरील बैठकींचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये मान्यतेकरिता सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक २: दिनांक २१/०३/२०२२ ते २९/०७/२०२२ या कालावधीतील झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.**

प्रस्तूत प्रकरणी उक्त विषय क्रमांक १ मध्ये झालेल्या चर्चेनुसार सदरील कार्यवाही अहवाल (Action Taken Report) प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ३: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रांरीचा तपशील प्राधिकरणाच्या मान्यता व निर्णयाकरिता सादर.**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेल्या तक्रांरीचा विभागनिहाय तपशील सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास सादर केला, त्यानुसार सांगोपांग चर्चा करण्यात आली.

या संदर्भात संबंधीत विभागाच्या परिक्षा समन्वयक यांनी आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या मार्फत तक्रारनिहाय कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ४: प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे लेखा विषयक अहवाल प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ सादर.**

प्रस्तूत प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही विभागानी लेखा विषयक सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

**विषय क्रमांक ५: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) एम. एस. कॉलेज ऑफ लॉ, ठाणे या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रस्तावांस संचालकांच्या तपासणी अहवालास अनुसरुन प्रवेश मान्यतेबाबत.

१. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील LLB ३ वर्षे या अभ्यासक्रमातील ११८प्रवेशित विद्यार्थी.
२. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील LLB ५ वर्षे या अभ्यासक्रमातील १० प्रवेशित विद्यार्थी.
३. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील LLB ३ वर्षे या अभ्यासक्रमातील १२० प्रवेशित विद्यार्थी.
४. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील LLB ५ वर्षे या अभ्यासक्रमातील १८ प्रवेशित विद्यार्थी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
... राज्य

एम.एस. कॉलेज ऑफ लॉ, ठाणे येथील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मधील विधी - ०३ वर्ष व विधी - ०५ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयाने सादर पुनर्विलोकन याचिकेच्या अनुषंगाने दिनांक २३/०३/२०२२ रोजी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्यासमोर सुनावणी झालेली असून या संदर्भात दिनांक २४/०६/२०२२ रोजीच्या सुनावणी निर्णयान्वये प्रत्येकी ०१ लाख दंडात्मक कारवाई करुन पुनर्विलोकन याचिका मान्य केलेली आहे.

प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाने दिनांक २५/०७/२०२२ रोजीच्या पत्राने दंडाची पूर्तता केली आहे व संबंधीत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेच्या यादीची मागणी केलेली आहे. या अनुषंगाने खालील तालिकेमध्ये दर्शविल्यानुसार एम.एस. कॉलेज ऑफ लॉ, ठाणे येथील ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या तपासणी अहवालानुसार त्रुटी नाहीत, अशा प्रवेशांना सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या स्तरावरुन प्राधिकरणाच्या मान्यतेच्या अधिन राहून तात्पुरती मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक वर्ष | अभ्यासक्रम | प्रवेशित विद्यार्थी संख्या | त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | मान्यता प्रदान करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१६-१७ | विधी ३ वर्ष | ११८ | ३३ | ८५ |
| २ | २०१६-१७ | विधी ५ वर्ष | १० | ०५ | ०५ |
| ३ | २०१७-१८ | विधी ३ वर्ष | १२० | ०७ | ११३ |
| ४ | २०१७-१८ | विधी ५ वर्ष | १८ | ०३ | १५ |

उपरोक्त प्रमाणे सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या स्तरावरुन केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. प्राधिकरणाच्या उक्त नमूद निर्णयानुसार एम.एस. कॉलेज ऑफ लॉ, ठाणे येथील शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ मधील विधी - ०३ वर्ष व विधी - ०५ वर्ष या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रवेश मान्यता पत्र निर्गमित करण्याबाबत प्राधिकरण कार्यालयाने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

**(ख)** <u>शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व त्यापुर्वीच्या शैक्षणिक वर्षातील उच्च शिक्षण विभागांतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे निकाल जाहिर करण्याबाबत.</u>

प्रस्तूत प्रकरणी स्वर्गीय शंकरराव सातव अध्यापक महाविद्यालय, कळमनुरी, जिल्हा-हिंगोली येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित २३ विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांनी दर्शविलेल्या त्रुटींच्या अभावी संबंधीत विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता अद्याप प्राप्त झालेली नाही, तद्नुषंगाने सदरील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्षातील विद्यापीठाचे निकाल राखुन ठेवण्यात आलेले आहे, यास अनुसरुन विद्यार्थ्यांनी प्रवेशास मान्यता मिळण्याची विनंती दिनांक २०/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदय, मा. उपमुख्यमंत्री महोदय व मा. मंत्री महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, म.रा. यांना केलेली आहे.

२. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांनी दिनांक २९/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित परंतू त्रुटीमध्ये दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश त्रुटीपूर्तता करुन दिनांक १/१०/२०२२ ते ३०/११/२०२२ या कालावधीमध्ये संचालनालय स्तरावर प्रमाणित करण्यासाठी महाविद्यालयांना विशेष बाब म्हणून अंतिम संधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

३. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदींनुसार शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी आढळल्या अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही व तद्नुषंगाने संबंधीत महाविद्यालयांना वेळोवेळी याबाबत कळविण्यात आलेले आहे. तथापि, संबंधीत विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाने दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. २(झ) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार व या संदर्भात प्राधिकरणाच्या १/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयांनी पुनर्विलोकन याचिका अर्ज प्राधिकरणास दाखल केलेले आहेत व त्यानुसार मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर विद्यापीठ-निहाय सुनावणी घेण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी पुनर्विलोकन अर्जामध्ये नमूद असलेली ०७ कागदपत्रे सादर करण्याबाबत सुनावणी दरम्यान उपस्थित सर्व संबंधीतांना कळविले होते, परंतू मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदरील माहिती सादर करण्यास बहुतांक्षी पुनर्विलोकन याचिका अर्जदार / महाविद्यालये असमर्थ ठरले. तथापि महाविद्यालयांनी सादर केलेल्या माहितीस अनुसरुन सुनावणी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत व सर्व संबंधीतांना ईमेलद्वारे कळविण्यात आलेले आहेत.

४. सद्यस्थितीमध्ये शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी दर्शविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोठया प्रमाणात आहे व संचालनालयाने दिनांक २९/०९/२०२२ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केल्यानुसार संचालनालय स्तरावर दिनांक १/१०/२०२२ ते ३०/११/२०२२ हा कालावधी खुप जास्त असून यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष नुकसान होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही व त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे.

५. प्रवेशित विद्यार्थ्यांचे निकाल जाहिर न झाल्यामुळे या संदर्भात विद्यार्थी/पालक, महाविद्यालये व विद्यापीठ स्तरावरुन वारंवार प्राधिकरण कार्यालयास पत्रांद्वारे / दूरध्वनी / ईमेलद्वारे विचारणा करण्यात येत होती/आहे.

६. या अनुषंगाने वरील बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व त्यापूर्वीच्या शैक्षणिक वर्षा मधील उच्च शिक्षण संचालनालय अंतर्गत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये ही बाब लक्षात घेऊन जे प्रवेशित विद्यार्थी पात्रतेचे निकष / नियम तसेच नियमानुसार विहित केलेली आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रांची पूर्तता पूर्ण करीत आहेत अशा विद्यार्थ्यांचे विद्यापीठाचे निकाल प्राधिकरणाच्या मान्यतेस अधीन राहून जाहिर करण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी दिनांक ३०/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. यास प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

७. शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांनी दिनांक २९/०९/२०२२ रोजीच्या पत्रामध्ये नमूद "संचालनालयाच्या अखत्यारीतील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित परंतू त्रुटीमध्ये दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश त्रुटीपूर्तता करुन दिनांक १/१०/२०२२ ते ३०/११/२०२२ या कालावधीमध्ये संचालनालय स्तरावर प्रमाणित करण्यासाठी महाविद्यालयांना विशेष बाब म्हणून अंतिम संधी उपलब्ध करुन देण्याबाबत" केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने परिच्छेद क्रमांक ०६ मधील मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे प्रस्तूत प्रकरणी दिनांक २९/०९/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे केलेल्या विनंतीस अनुसरुन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी तपासणी/पडताळणी प्रक्रिया पूर्ण करुन स्वंयस्पष्ट अहवाल प्राधिकरणास १५ दिवसांत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्त नुसार संचालक, उच्च् शिक्षण संचालनालयाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पडताळणी करुन प्राधिकरणासमोर मान्यतेस सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(ग) श्री. लक्ष्मनराव मानकर कॉलेज ऑफ एज्युकेशन, गोंदिया या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील बी.एड अभ्यासक्रमाच्या १५ प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत, संचालकांच्या अहवालानुसार कागदपत्रांची त्रुटी असलेल्या प्रवेशास अंतिम मान्यता मिळण्याबाबत.

श्री. लक्ष्मनराव मानकर कॉलेज ऑफ एज्युकेशन, गोंदिया या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील बी.एड अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यता प्रस्तावास प्राधिकरणाच्या दि.३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीत संचालकांच्या अहवालानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. संचालकांच्या अहवालानुसार सदर महाविद्यालयातील एकुण प्रवेशित १०४ विद्यार्थ्यांपैकी १५ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये कागदपत्रांच्या त्रुटी नमुद करुन ८९ विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना मान्यता देण्यात आली असून, दिनांक ८/१२/२०२१ रोजी मान्यतापत्र निर्गमित करण्यात आले आहे.

२. श्री. लक्ष्मनराव मानकर कॉलेज ऑफ एज्युकेशन, गोंडिया या महाविद्यालयाने दि.२७/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील बी.एड अभ्यासक्रमातील या १५ प्रवेशित विद्यार्थ्यांच्या त्रुटीची पुर्तता करण्यासाठी पुनर्विलोकन याचिका दाखल केली होती. त्याअनुषंगाने, दि.२४/०६/२०२२ रोजी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचा निर्णय कळविण्यात आला. त्या अनुषंगाने महाविद्यालयाने दिनांक २१/०९/२०२२ रोजीच्या पत्राने या प्रवेशांना मान्यता देण्याची पुन:श्च विनंती केली.

३. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दि.२९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील बाब क्र. २ ड मधील निर्णयाच्या अनुषंगाने, पुनर्विलोकन याचिकांचे सुनावणी निर्णयाबाबत महाविद्यालयांच्या निवेदनांच्या अनुषंगाने, महाविद्यालयाने सादर केलेली विद्यार्थ्यांच्या त्रुटींची कागदपत्रे तपासून आवश्यक त्या शिफारशीसह सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्यामार्फत सादर करतील असा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी दिनांक २८/०९/२०२२ रोजीच्या पत्राने संबंधीत महाविद्यालयास या १५ विद्यार्थ्याच्या प्रवेशांना तात्पुरती मान्यता देण्यात आली.

४. तसेच प्रस्तूत प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या दिनांक २८/०९/२०२२ रोजीच्या पत्रास प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(घ) बॅ. एस. के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय, नागपूर येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक बी.एड अभ्यासक्रमास प्रवेशित कु. चित्रांशी मुकेश शास्त्री यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथील याचिका क्र.६०४८/२०२२ मधील दिनांक ६/१०/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेशानुसार मान्यतेबाबत.

बॅ. एस.के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित कु. चित्रांशी मुकेश शास्त्री यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ, नागपुर येथील याचिका क्रमांक ६०४८ / २०२२ मधील दिनांक ६/१०/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेशाचे अवलोकन करण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

२. अधिनियम २०१५ मधील तरतूदींस अनुसरुन शिक्षण संचालनालय (उच्च् शिक्षण), पुणे यांनी सादर कलेल्या दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या प्रवेश पडताळणी अहवालानुसार बॅ. एस.के. वानखेडे कॉलेज ऑफ एज्युकेशन, नागपुर (कॉलेज सांकेतांक : १४५२१००१) येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित कु. चित्रांशी मुकेश शास्त्री यांच्या प्रवेश प्रकरणी "Submit Provisional allotment Letter" अशी त्रुटी दर्शविली असल्याने सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही व या संदर्भात महाविद्यालयाने दिनांक ३०/१२/२०२१ रोजी पुनर्विलोकन याचिका अर्ज दाखल केला व तद्नुषंगाने दिनांक ५/०४/२०२२ रोजी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्यासमोर सुनावणी झाली व सुनावणी प्रकरणी प्राधिकरणाचे दिनांक २४/०६/२०२२ रोजीचे आदेश संबंधीतांना कळविण्यात आलेले आहेत.

३. प्राधिकरणाच्या दिनांक २४/०६/२०२२ रोजीच्या निर्णयास अनुसरुन संबंधीत विद्यार्थी व महाविद्यालयाने मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ येथे याचिका क्रमांक ६०४८ / २०२२ दाखल केली, प्रस्तूत प्रकरणी न्यायालयाने दिनांक ६/१०/२०२२ रोजी आदेश पारीत केलेल आहेत. तसेच बॅ. एस.के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय, नागपुर यांनी दिनांक ७/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कु. चित्रांशी मुकेश शास्त्री यांच्या प्रवेश प्रकरणी दर्शविलेल्या त्रुटींची पूर्तता अर्थात Provisional allotment letter ची प्रत सादर केलेली आहे.

४. सबब संबंधीत महाविद्यालयाने दिनांक ७/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या कागदपत्रांनुसार कु. चित्रांशी मुकेश शास्त्री यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक बी.एड. अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रकरणी संचालनालयाने दर्शविलेल्या त्रुटीची पूर्तता केली असल्याची बाब सकृत दर्शनी स्प्ष्ट आहे.

५. या अनुषंगाने उक्त नमूद वस्तूस्थिती तथा न्यायालयाचे निर्देश व तद्नुषंगाने ॲड नाहुश खुबाळकर यांनी न्यायालयीन निद्रेशानुसार दिलेल्या सुचना विचारात घेता बॅ. एस.के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित कु. चित्रांशी मुकेश शास्त्री यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

६. तसेच प्रस्तूत प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी निर्गमित केलेल्या दिनांक १४/१०/२०२२ रोजीच्या पत्रास प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(ड) <u>जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनियरींग, कोल्हापुर या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ प्रथम वर्ष कॉम्पुटर सायन्स अँड इंजि. मध्ये प्रवेशित कु.सय्यद रहुफ शौकतअली या विद्यार्थ्याचा ओ.बी.सी. प्रवर्गातील प्रवेश जात वैधता प्रमाणपत्राअभावी अगेन्स्ट कॅप मधून प्रवेश घेतल्याने खुला प्रवर्गातून बदल करुन मान्यता मिळणेबाबत.</u>

जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनियरींग, कोल्हापुर या महाविद्यालयाने दि.४/१०/२०१९ रोजीच्या पत्राने शै. वर्ष २०१८-१९ प्रथम वर्ष कॉम्पुटर सायन्स अँड इंजि. मध्ये प्रवेशित कु.सय्यद रहुफ शौकतअली या विद्यार्थ्याचा ओ.बी.सी. प्रवर्गातील प्रवेश जात वैधता प्रमाणपत्राअभावी अगेन्स्ट कॅप मधून प्रवेश घेतल्याने खुला प्रवर्गातून बदल करुन मिळणेबाबत विनंती केली आहे. या संदर्भात महाविद्यालयाने दिनांक ५/०१/२०२१ रोजी पुनर्विलोकन याचिका दाखल केली.

२. सदर प्रकरणी दिनांक ७/०१/२०२१ रोजी सुनावणी घेण्यात आली असून, सदर सुनावणी आदेशान्वये महाविद्यालयाची पुनर्विलोकन याचिका फेटाळण्यात आली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

३. कु. रहुफ शौकतअली सय्यद यांचा दि.१०/०५/२०२२ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने, प्राधिकरणाने, "ज्या महाविद्यालयांनी पुनर्विलोकन याचिका प्राधिकरणाकडे सादर केली आहे, अशा संबंधित विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या आगामी परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येत आहे. तसेच, ज्या विद्यार्थ्यांचे मागील परीक्षेचे निकाल राखीव असतील अशा विद्यार्थ्यांचे निकाल जाहिर करुन त्यांना पुढील परीक्षेला बसण्यास परवानगी देण्यात यावी. मात्र या विद्यार्थ्यांच्या पुढील घेण्यात येणाऱ्या परीक्षेचा निकाल मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण मुंबई यांच्या अंतिम सुनावणी आदेश/निर्देशाशिवाय जाहीर करण्यात येऊ नयेत असे मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी दिनांक १७/०२/२०२२ रोजी निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने, उचित कार्यवाही करण्याबाबत संबंधीत विद्यापीठास दिनांक १३/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

४. महाविद्यालयाने दिनांक १२/०५/२०२२ रोजी पुन:श्च पुनर्विलोकन याचिका दाखल केली. त्याअनुषंगाने, सदर महाविद्यालयास दिनांक ३/०८/२०२२ रोजी सुनावणी देण्यात आलेली आहे. तसेच संबंधीत महाविद्यालयाने सुनावणी दरम्यान सांगितलेल्या आवश्यक कागदपत्रांची पुर्तता दिनांक ८/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

५. प्रस्तूत प्रकरणी तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक ११/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कु. रहुफ शौकतअली सय्यद या विद्यार्थ्यांचा प्रवेश केंद्रीभूत प्रवेशा नंतर रिक्त (ACAP) जागेवर संस्थास्तरावर झालेला आहे. सदर विद्यार्थी खुल्या प्रवर्गासाठी आवश्यक पात्रता धारण करत असल्याने व ACAP प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक नसल्याने विद्यार्थ्यांचा प्रवेश नियमित करण्याबाबत शिफारस केलेली आहे.

६. या अनुषंगाने वरील बाबी विचारात घेता श्री रहुफ शौकतअल्ली सय्यद प्रथम वर्ष (कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनियरींग) या विद्यार्थ्याच्या प्रवेशास खुल्या संवर्गातून प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(च) <u>द्वारका बहुउद्देशीय संस्थेचे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, बुलढाणा या संस्थेवर शास्तीची कारवाई करण्याबाबत – कु पुजा संतोष गवळी.</u>

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे दिनांक १६/०९/२०२२ रोजीचे द्वारका बहुउद्देशीय संस्थेचे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, बुलढाणा या संस्थेवर शास्तीची कारवाई करण्याच्या अनुषंगाने संचालनालयाने या संदर्भात खालीलप्रमाणे सादर केले आहे.

(अ) कु. पुजा संतोष गवळी या विद्यार्थीनीने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये द्वारका बहुउद्देशीय संस्थेचे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, बुलढाणा या संस्थेमध्ये थेट द्वितीय वर्ष पदवी औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला होता. तथापि द्वितीय वर्षानंतर आर्थिक अडचणीमुळे प्रवेश रद्द करण्याबाबत व शैक्षणिक कागदपत्रे परत करण्याची विनंती संस्थेकडे केली होती. तथापि संस्थेने कागदपत्रे परत न करता विद्यार्थीनीकडे उर्वरीत दोन वर्षाचे शुल्क मागितले. त्याविरुध्द सदर विद्यार्थीनीने जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग वाशिम यांचेकडे तक्रार दाखल केली होती.

(ब) सदर प्रकरणी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वाशिम यांनी दिनांक १२.४.२०२२ रोजी निर्णय निर्गमित केला असून तक्रारकर्त्याला संस्थेने रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख केवळ) दिनांक १७.१२.२०२० पासून ते सदर रक्कम तक्रारकर्त्याला प्रत्यक्ष मिळेपर्यंत त्यावर ~~१९%~~ द.सा.द.शे. होणा-या व्याजासह देण्याचे तसेच तक्रारीचा खर्च रुपये २०००/- (रुपये दोन हजार केवळ) देण्याचे आदेश पारीत केले आहेत. तसेच सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

अमरावती यांना सदर संस्थेवर महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार शास्ती करण्याबाबत संचालनालयास प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत.

(क) जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वाशिम यांनी दिलेल्या निर्णयानुसार सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांनी दिनांक ४/८/२०२२ रोजीच्या पत्रानुसार सदर संस्थेवर महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार शास्ती करण्याबाबत संचालनालयास प्रस्ताव सादर केला आहे.

२. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वाशिम यांनी दिनांक १२/४/२०२२ रोजी दिलेला निर्णय विचारात घेऊन आणि सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती यांनी प्रस्तावित केल्यानुसार द्वारका बहुउद्देशीय संस्थेचे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, बुलढाणा संस्थेवर महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम २०(१) "मधील तरतूदीनुसार शास्तीची कारवाई करण्याबाबत आपल्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती विषयांकित पत्रान्वये संचालक तंत्रशिक्षण संचालनालयाने केली आहे.

३. या अनुषंगाने द्वारका बहुउद्देशीय संस्थेचे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, बुलढाणा या संस्थेमध्ये थेट द्वितिय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. पुजा संतोष गवळी यांच्या प्रवेश रद्द व तद्नुषंगाने कागदपत्रे / शुल्क परताव्याच्या प्रकरणी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक १६/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालास अनुसरुन महाविद्यालयाने अधिनियम २०१५ मधील तरतूदींचे उल्लधंन केले आहे, अशी प्राधिकरणाची धारणा आहे. या अनुषंगाने अधिनियम २०१५ मधील केलम २० च्या तरतूदींनुसार संबंधीत संस्थेवर रु. ०५ लाख दंड आकारण्यात येत आहे, सदरचा दंड संस्थेने प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे त्वरीत भरणा करावा. तसेच कु. पुजा संतोष गवळी यांनी केलेल्या विनंती नुसार त्यांचा प्रवेश रद्द करुन त्यांचे आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे / शुल्काचा परतावा करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणास तात्काळ सादर करावा.

(छ) बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, अहमदपूर द्वारा संचलित, वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, शिरुर ताजबंद, जिल्हा - लातूर येथील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यासायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी.

बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, अहमदपूर द्वारा संचलित, वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, शिरुर ताजबंद, जिल्हा - लातूर येथील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यासायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी देशमुख भोगले लिगल असोसिएटस, मुंबई यांनी दिनांक २९/०९/२०२२ रोजींची पत्रे व मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथील याचिका क्रमांक १२८५६/२०२१ मधील दिनांक १५/०९/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेशाचे अवलोकन करण्यात आले.

२) वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, शिरुर ताजबंद, जिल्हा - लातूर येथील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित १) कु. प्रकाश रमेशराव डोंगरगवे, २) ईरशादबी शेख, ३) कु. मोहिनी दत्तात्रय गिरी व ४) कु. शितल शंकरराव भांगे या विद्यार्थ्यांच्या प्रवेशास आवश्यक कागदपत्रांच्या अभावी प्राधिकरणाची मान्यता प्रदान झालेली नाही व या संदर्भात महाविद्यालयाने पुनर्विलोकन याचिका दाखल केली व तद्नुषंगाने दिनांक १७/०२/२०२१ रोजी मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्यासमोर सुनावणी झाली व सुनावणी प्रकरणी प्राधिकरणाचे दिनांक २२/१०/२०२१ रोजीचे आदेश संबंधीतांना कळविण्यात आलेले आहेत.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

३) प्राधिकरणाच्या दिनांक २२/१०/२०२१ रोजीच्या निर्णयास अनुसरुन कु. प्रकाश रमेशराव डोंगरगवे, व कु. शितल शंकरराव भांगे या विद्यार्थीनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्रमांक १२८५६/२०२१ दाखल केली, प्रस्तूत प्रकरणी न्यायालयाने दिनांक १५/०९/२०२२ रोजीच्या आदेश पारीत केलेले आहेत, न्यायालयाच्या निर्देशास अनुसरुन संबंधीतांनी देशमुख भोगले लिगल असोसिएटस, मुंबई यांच्या मार्फत दिनांक २९/०९/२०२२ रोजीची निवेदने प्राधिकरणास सादर केलेली असून सदरील पत्रान्वये विद्यार्थ्यांचे द्वितिय वर्षाचे निकाल जाहिरकरण्याबाबत व त्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता मिळण्याची विनंती केलेली आहे.

४) या अनुषंगाने वरील नमूद वस्तूस्थिती विचारात घेता बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ, अहमदपूर द्वारा संचलित, वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, शिरुर ताजबंद, जिल्हा - लातूर येथील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यासायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित व याचिका क्रमांक १२८५६/२०२१ मधील याचिकाकर्ते १) कु. प्रकाश रमेशराव डोंगरगवे व २) कु. शितल शंकरराव भांगे या विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथील याचिका क्रमांक १२८५६/२०२१ मधील दिनांक १५/०९/२०२२ रोजीच्या न्यायालयीन आदेशास अनुसरुन प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

(ज) <u>वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेबाबत उमेदवारांकडून प्राप्त निवेदन.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदव्युत्त्र वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सेवा-अंतर्गत उमेदवारांचे प्रवेशासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई येथील दिनांक २६/०९/२०२२ रोजीचे आदेश लागू न करण्याबाबत आणि वैद्यकीय पदव्युत्त्र अभ्यासक्रमाच्या दिनांक ३/०९/२०२२ रोजीचे प्रथम प्रवेश फेरीमध्ये वाटप न केलेल्या जागांबाबत प्राप्त निवेदने या अनुषंगाने आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सादर केलेल्या दिनांक १०/१०/२०२२ रोजीच्या प्रस्तावाद्वारे सादर केलेल्या वस्तूस्थिती अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

(झ) <u>वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई येथील शासन निर्णय क्रमांक एमईडी १०२०/प्र.क्र. ९०/२०/शिक्षण-२, दिनांक २६/०९/२०२२ मधील तरतूदींन्वये वैद्यकीय पदयुत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रियेबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील वैद्यकीय पदव्युत्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शासनाच्या सेवेतील वैद्यकीय अधिकारी (सेवाअंतर्गत उमेदवार) यांच्यासाठी २० टक्के आरक्षण ठेवणेबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई येथील दिनांक २६/०९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भात आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सादर केलेल्या दिनांक १०/१०/२०२२ रोजीच्या प्रस्तावाद्वारे सादर केलेल्या वस्तूस्थिती अहवालाची प्राधिकरणाने नोंद घेतली.

(ञ) <u>व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाकरिता राज्य स्तरीय कोटा प्रवेश प्रक्रियेकरिता शासनाकडून प्राप्त माहितीपुस्तिका.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदव्युत्त्र वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमा करिता राज्य स्तरीय प्रवेश प्रक्रियेकरिता शासनाकडून माहितीपुस्तिका प्राप्त झालेली असून त्यानुसार प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याचे आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी नमूद केले. नीट-पीजी-२०२२ व नीट-युजी-२०२२ साठीच्या प्रवेश माहितीपुस्तिका प्राधिकरणाच्या सर्व मा. सदस्यांना अवगत करुन सर्व सदस्यांनी त्यांचे अभिप्राय सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९ नुसार तक्रार निवारण करण्यासंबंधीचे सर्व अधिकार प्रवेश नियामक प्राधिकरणास आहेत, ही बाब स्पष्ट करण्यात आली.

(ट) <u>उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत दिनांक ०२, ०३ व ०४ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या सामाईक प्रवेश परिक्षेदरम्यान झालेल्या तांत्रिक कारणे / Server च्या समस्या, एका पेक्षा अधिक वेळ संगणक बंद पडल्यामुळे फेर परिक्षेबाबत.</u>

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत दिनांक २ ते ४ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये १) विधी-३ वर्षे, २) विधी-५ वर्षे, ३) बीए/बी.एस्सी.-बी.एड., ४) बी.एड.-एम.एड., ५) बी.पी.एड., व ६) एम.एड. या अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परिक्षा आयोजित करण्यात आलेल्या होत्या, परंतू सदर परीक्षे दरम्याने तांत्रिक अडचणी/Server च्या समस्या एका पेक्षा अधिक वेळा संगणक बंद पडणे, उमेदवार परीक्षा प्रणालीतून एका पेक्षा अधिक वेळा बाहेर येणे या मुळे सदरील परीक्षा सुव्यवस्थित पध्दतीने पार पडली नसल्याने सीईटी कक्षास अनेक संकटांना सामोरे जावे लागल्याचे आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी नमूद केले. तसेच या संदर्भात सादर केलेल्या दिनांक ७/१०/२०२२ रोजीच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

वरील बाब गंभीर स्वरुपाची असून प्राधिकरण याची नोंद घेत आहे. प्रस्तूत प्रकरणी घडलेल्या घटनेचा संक्षिप्त /वस्तूस्थिती अहवाल संबंधीत विभागांनी तसेच संबंधीत सेवा पुरवठादार यांचा तांत्रिक अहवाल १५ दिवसांत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या मार्फत प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(ठ) <u>शैक्षणिक वर्ष २०२-२३ मधील उच्च शिक्षण विभागांअंतर्गत पदवी व पदव्युत्तर ०८ अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता शासन मान्यता प्राप्त माहिती पुस्तिका.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील उच्च शिक्षण विभागाअंतर्गत् व्यावसायिक पदवी व पदव्युत्र ०८ अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता शासन मान्यता प्राप्त माहितीपुस्तिका प्राप्त झालेली असून त्यानुसार प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याचे आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी नमूद केली. प्राधिकरणाने याबाबत नोंद घेतली.

या अनुषंगाने उच्च शिक्षण व इतर (तंत्र् शिक्षण, कृषी व कला) विभागांतर्गत करण्यात येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश् प्रक्रियेसाठीचा माहिती पुस्तिका प्राधिकरणाच्या सर्व मा. सदस्यांना अवगत करुन सर्व सदस्यांनी त्यांचे अभिप्राय सादर करण्याचे निर्देश दिले आहे.

(ड) <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील उच्च शिक्षण विभागांअंतर्गत पदवी व पदव्युत्तर ०८ अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील उच्च शिक्षण विभागाअंतर्गत् पदवी व पदव्युत्र ०८ अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक सीईटी कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर अभ्यासक्रमनिहाय दिनांक २३/०९/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आले असून त्यानुसार प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याचे आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी नमूद केली. प्राधिकरणाने याबाबत नोंद घेतली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ढ) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावर कार्यरत श्री. पंकज पाटील, लिपिक (कला शिक्षण विभाग) यांच्या नियुक्तीस मुदतवाढ व मासिक वेतन वाढीबाबत.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील निव्वळ कंत्राटी तत्वावर कार्यरत श्री. पंकज पाटील, लिपिक (कला शिक्षण विभाग) यांच्या नियुक्तीस मुदतवाढ देण्याबाबत सादर केलेल्या दिनांक १०/१०/२०२२ रोजीच्या प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत असून श्री. पंकज पाटील यांच्या कंत्राटी तत्वावरील सेवा चालु ठेवण्यास दिनांक १/१०/२०२२ पासून पुढील ११ महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे.

(ण) वैद्यकीय शिक्षण विभागाअंतर्गत होणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण विभाग, मुंबई यांच्याकडून अनुभवी अधिकारी उपलब्ध होण्याबाबत.

वैद्यकीय शिक्षण विभागाअंतर्गत होणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता अधिनियम २०१५ मधील तरतूदीं तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१५-प्र.क्र. २७६/तांशि-४, दिनांक ४/०८/२०१५ अन्वये संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून पुर्णवेळ कामकाजासाठी नियमित मनुष्यबळ अद्याप उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. सदरील प्रक्रियेचे कामकाज व गांर्भीय लक्षात घेता आयुक्त, वैद्यकीय शिक्षण विभाग, मुंबई / संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक ५/०८/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अधिकारी उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या स्तरावर उचित कार्यवाही त्वरीत करावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 9/11/22